**<u>निशाणी क्र. ४ खालील कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अंर्तगत कलम २३ वरील अर्जावर आदेश</u>**
**(दिनांक २०/०४/२०२२)**

**१)** प्रस्तुतचे प्रकरण कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत विविध मागण्यासाठी दाखल केले असुन ते सध्या न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यानच्या काळात अर्जदाराने सदरचा अंतरीम अर्ज निशाणी क्र. ४ प्रमाणे केलेला आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतेवेळेस तिच्या मुळ अर्जातील कथन विचारात घेण्यात यावे अशी विनंती केली. गैरअर्जदारांविरूद्ध झालेला विनाजबाब आदेश नि.क्र. ११ वरील आदेशाप्रमाणे खर्च लावुन दिनांक १४.०३.२०२२ रोजी रद्द करण्यात आला. परंतु वारंवार संधी देवुन देखील, अदयापपर्यंत गैरअर्जदारांनी खर्चाची पुर्तता करून नि.क्र. ११ वरील आदेशाची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदाराचे लेखी म्हणणे अदयापपर्यंत अभिलेखावर दाखल करून घेण्यात आलेले नाही. म्हणुन सदरील अर्ज गैरअर्जदाराच्या जबाबाशिवाय निकाली काढण्यात येतो.

**२)** अर्जदार हीने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे तिच्याकरीता दरमहा ५,०००/— व तिच्या मुलाकरीता दरमहा ५०००/— अशी एकुण दरमहा रक्कम रूपये १०,०००/— गैरअर्जदाराकडुन मिळणे करता अंतरिम आदेश मागितला आहे. तिने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, तिचे व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक १४.०३.२०१४ रोजी झाले व लग्नसंबंधातुन अर्जदार हिला एक मुलगा नामे शिवराज आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारास दिनांक ०७.०७.२०२१ रोजी घराबाहेर काढुन दिल्यामुळे ती तेव्हापासुन तीच्या माहेरी राहात आहे. तिच्यावर तिच्या मुलाची जबाबदारी आहे. ती स्वत: व तीचा मुलगा म्हाता—या आईवडीलांच्या दयेवर जीवन जगत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने पती व पिता या नात्याने अर्जदारास त्यांच्या उदरनिर्वाहाकरीता कधीही पैसे पाठविलेले नाही. अर्जदारास उत्पन्नाचे काही एक साधन नाही.

**४)** गैरअर्जदार हा गर्भश्रीमंत असुन प्राप्ती पेंटींग कंपनी मध्ये खाजगी नोकरी करून त्यापासुन दरमहा २०,०००/— रूपये कमवितो तसेच गैरअर्जदाराकडे ७ एकर बागायती शेती असुन त्यातुन वर्षाकाठी ८ ते १० लाख रूपये उत्पन्न मिळवितो. त्याच्यावर अर्जदार व तिचा मुलगा यांच्याव्यतिरीक्त कोणाचीही जबाबदारी नाही.

**५)** गैरअर्जदार याच्याविरूद्ध विनाजबाब आदेश पारीत झालेला असल्यामुळे त्याचे कथन अभिलेखावर उपलब्ध नाही. म्हणुन प्रस्तुतच्या अर्जाचा विचार करतेवेळेस फक्त अर्जदाराच्याच कथनाचा विचार करणे शक्य आहे. अर्जदाराने दस्त यादी नि.क्र. ३ सह अर्जदार व गैरअर्जदार यांच्या लग्नाची पत्रिका, दिनांक २४.०१.२०२१ रोजी अर्जदाराने गैरअर्जदारास पाठविलेली नोटीस, पोस्टाची पावती, अर्जदार व तिच्या मुलाच्या आधारकार्डची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे प्रकरणात दाखल केलेली आहे.

**६)** अर्जदाराने तिच्या मुळ अर्जामध्ये तिच्या लग्नाच्या पाच महिन्यानंतर, गैरअर्जदार हा तिच्या चारीत्र्यावर संशय घेवून दारूचे नशेत तिला मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र. १ ते ६ हे देखील तिचा शारिरीक व मानसिक छळ करीत होते व दिनांक ०७.०७.२०२१ रोजी गैरअर्जदारांनी तिला मारहाण करून घराबाहेर हाकलुन दिले असे कथन केलेले आहे. सदरील कथनास अर्जासोबतच्या शपथपत्राचा आधार आहे. त्यामुळे प्रकरणाच्या प्राथमिक स्थितीमध्ये अर्जदाराने शपथेवर केलेले कथन नाकारण्यास अभिलेखावर काहीही सबळ कारण उपलब्ध नाही. तिच्या कथनावरून अर्जदाराचा शारीरिक व मानसिक हिंसाचार झाला आहे व होत आहे असे प्राथमिकदृष्टया दिसुन येते. .

**७)** अभिलेखाचा विचार करता आज रोजी अर्जदार ही तिच्या मुलासह तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचा पती व त्यांचा मुलाचा पिता या नात्याने त्याच्या पालनपोषणास बांधील आहे अभिलेखावर गैरअर्जदार क्र. १ च्या उत्पन्नाबाबतचा ठोस पुरावा उपलब्ध नाही. परंतु अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ हा प्राप्ती पेंटींग कंपनी मध्ये खाजगी नोकरीवर असुन त्यातुन त्याला दरमहा २०,०००/— रू. मिळतात तसेच त्याच्याकडे ७ एकर बागायती शेती असुन त्यातुन तो ८ ते १० लाख रूपयांचे उत्पन्न मिळवितो. परंतु सदर तोंडी कथनाच्या समर्थनार्थ काहीही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा नोकरी करतो व तो शेतकरी कुटुंबातील आहे. त्यावरून तो शारीरिकदृष्टया सक्षम आहे असे लक्षात येते. त्यामुळे जरी अभिलेखावर गैरअर्जदाराच्या व्यवसाय व उत्पन्नाबाबतचा ठोस पुरावा उपलब्ध नसला तरी देखील

गैरअर्जदार क्र. १ हा अंग मेहनत करून कमीत कमी दरमहा ७,०००/— ते ८,०००/— रूपये दरमहा कमवण्यास सक्षम आहे असा निष्कर्ष सहजपणे काढणे शक्य आहे. अश्या परिस्थितीत गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्न मिळवण्याच्या क्षमतेचा व अर्जदार व तिच्या मुलाच्या दैनंदिन गरजांचा विचार करता अर्जदारास गैरअर्जदार क्र. १ याचे कडून अंतरिम खावटी म्हणुन रक्कम रूपये ३,०००/— प्रति महिना देणे न्यायोचित होईल असे मी गृहीत धरतो. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करतो :—

## <u>आदेश</u>

(१) नि.क्र. ४ वरील अंतरीम अर्ज अशंतः मंजूर करण्यात आला.

(२) गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास अंतरीम पोटगी म्हणून दरमहा रू. ३०००/— (अक्षरी तीन हजार रूपये फक्त) अर्ज दाखल तारखे पासुन म्हणजेच दि. २८.१०.२०२१ पासून ते मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत द्यावेत.

(३) कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २४ अन्वये या आदेशाची प्रत उभयपक्षकारांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

Digitally signed by KEDAR KISHOR CHAUDHARI
Date: 2022.04.20 18:27:53 +0530

**(के. के. चौधरी)**

दि. २०/०४/२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्या. क्र. २),
कारंजा लाड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | R. A. Charthal (Stenographer-3) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C., Karanja (Lad), Dist. Washim. |
| Date | :- | 20/04/2022 |
| Order signed by the presiding officer on | :- | 20/04/2022 |
| Order uploaded on | :- | 20/04/2022 |